# प्रकरण सहावे

## भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास

६.१ प्रस्तावना

६.२ भ्रष्टाचार : कारणे आणि उपाय

६.३ भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास : लोककल्याणासाठी काळाजी गरज

६.४ भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाचे ध्येय

६.५ भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाची उद्दिष्टे

६.६ भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाची मार्गदर्शक तत्त्वे

६.७ जिल्हा / तालुका कार्यकारिणीच्या निवडीचे निकष / पध्दती

६.८ कार्यकारिणीस मान्यता देण्याची पध्दती

६.९ सभासदांनी करावयाच्या कार्याची पंचसूत्री

६.१० पत्रव्यवहाराबाबत

६.११ तक्रार निवारणासंबंधी...

६.१२ जिल्हा शाखेने आर्थिक हिशेब ठेवण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे

६.१३ भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन एक परिवर्तनवादी चळवळ :

## ६.१ प्रस्तावना :

महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद यांसारख्या महापुरुषांच्या विचारांचा अंगीकार करुन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी ते विचार प्रत्यक्ष जीवनात उतरविले व त्या विचारांच्या साहाय्याने एक आदर्श उभा केला. महात्मा गांधींच्या विचारातून स्वयंपूर्ण खेडे, स्वयंशासित खेडे, स्वावलंबी खेडे, एक आदर्श गाव यांसारखे महत्त्वपूर्ण विचार अण्णा हजारे यांनी घेतले व ते विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवले. त्याचेच एक उदाहरण म्हणजे राळेगणसिध्दी हे एक आदर्श गाव आपल्याला डोळ्यासमोर ठेवता येईल. अण्णा हजारे यांना बालपणापासून अन्यायाची चीड होती. अन्याय करणारा सामान्य माणूस असो अथवा प्रत्यक्ष सरकार, त्यास अण्णा हजारे यांनी नेहमीच विरोध केला. पण अण्णा हजारे यांनी हा विरोध सशस्त्र मार्गाने किंवा हिंसक मार्गाने कधीच केला; नाही तर तो गांधीवादी मार्गाने केला. त्यासाठी त्यांनी पत्रव्यवहार, जनआंदोलने, उपोषण यांसारख्या अहिंसात्मक साधनांचा आधार घेतला. त्याप्रमाणे स्वामी विवेकानंदांच्या विचारातून अण्णा हजारे यांनी 'जनसेवा हीच इश्वर सेवा' हा महत्त्वपूर्ण विचार अंगीकृत केला व त्यानुसार आपले समाजसुधारणेचे कार्य सुरु ठेवले.

समाजसुधारणेचे कार्य करत असताना अण्णा हजारे यांनी जुन्या रुढी, परंपरा, जुने कायदे यावर प्रहार केला व ते बदलून टाकले. उदाहरणार्थ गोपनीयतेचा कायदा रद्द करुन माहितीचा अधिकार हा कायदा करण्यास सरकारला भाग पाडले. तत्सम असे अनेक इतर कायदे पारित करुन घेतले. अण्णा हजारे यांच्या कार्याचे व्यवस्थित अवलोकन केले तर असे दिसून येते की अण्णा

हजारे यांनी एका बाजूला समाज, गाव, राज्य, देशसुधारणेकडे लक्ष देऊन कार्य केले तर दुसऱ्या बाजूला भ्रष्ट शासन, भ्रष्ट प्रशासनाविरुध्द आंदोलन वेळोवेळी पुकारले. म्हणजे अण्णा हजारे यांना केवळ समाज सुधारणाच अपेक्षित नव्हत्या तर शासन व्यवस्था, प्रशासन यात पारदर्शिता अपेक्षित होती. शासन आणि प्रशासनात निर्माण झालेला व्यभिचार, भ्रष्टाचार अण्णा हजारे यांना नष्ट करावयाचा आहे.

अण्णा हजारे यांच्या मते भारतीय स्वातंत्र्यासाठी अगणित स्वातंत्र्यवीरांनी आपल्या घरादारावर निखारे ठेवले. अनेकांनी आपले प्राण स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात अर्पण केले. त्यामुळे आपल्याला स्वातंत्र्याची पहाट पाहायला मिळाली. स्वातंत्र्यानंतर भारत एक बलशाली राष्ट्र बनेल, स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर होईल. प्रत्येक नागरिकास स्वातंत्र्याची मधुर फळे चाखायला मिळतील असे स्वप्न प्रत्येकाने रंगवले होते; परंतु स्वराज्याचे सुराज्य झालेच नाही. अनेक भयानक समाजघातक कृत्यांनी देशात अराजकाची परिस्थिती निर्माण झाली आहे. सामान्य भारतीयास जगण्याचा हक्कच नाकारला जात आहे. देशातली आजची भयानक अवस्था पाहून हृदय वेदनांनी पोळून निघते आहे.

देशाची आज जी दुरवस्था झाली आहे, तिला प्रत्येक क्षेत्रात फोफावलेला भ्रष्टाचार हे एक प्रमुख कारण आहे. गेल्या पन्नास वर्षांत जो काही विकास झाला तो भ्रष्टाचाररुपी बकासुराने गिळंकृत केला आहे. भ्रष्टाचाराच्या वाळवीने देश पोखरला आहे. एखाद्या बुभुक्षितासारखी देशाची अवस्था झाली आहे.

भ्रष्टाचारामुळे सारखी महागाई वाढते आहे. सामान्य माणसाला जीवन जगणे अशक्य  झ ाले आहे. भ्रष्टाचारामुळे आपले स्वातंत्र्यच धोक्यात आले आहे. भ्रष्टाचाररुपी भयानक असुरांवर प्रहार केल्याशिवाय यापुढे जनतेला जगता येणार नाही, तरच भ्रष्टाचाराच्या मगरमिठीतून देश आणि जनतेची सुटका होणार आहे. भ्रष्टाचाराचा नायनाट केला, तरच देश आणि जनता खऱ्या अर्थाने स्वतंत्र होईल. त्यासाठी भ्रष्टाचारविरुध्द जनआंदोलनाचा लढा पुकारण्यात आला आहे, असे अण्णा हजारे म्हणतात.

भ्रष्टाचारविरुध्द जनआंदोलनाचा लढा समाजाच्या सर्व स्तरांवर व्यापकरीत्या व प्रखरपणे लढविला जायला हवा. हा लढा कुणा व्यक्ती अगर कुणा राजकीय पक्षाविरुध्द नाही तर भ्रष्टाचारी प्रवृत्तीविरुध्द आहे. या आंदोलनाबाबत आपण तटस्थ अथवा निष्क्रिय राहिलो तर भ्रष्टाचार फोफावण्यास प्रोत्साहन दिल्यासारखे होईल, भ्रष्टाचाराने निर्माण झालेल्या जिवघेण्या आगीच्या दाहकतेत सामान्य जनता होरपळून निघेल हे सर्व सत्प्रवृत्त व सद्‌विचारी लोकांनी जाणले पाहिजे, असे अण्णा हजारे म्हणतात. भ्रष्टाचाराविरुध्दच्या लढ्यात भाग घेणे हीच खरी देशभक्ती आहे असे अण्णा हजारे यांचे मत आहे.

## ६.२ भ्रष्टाचार : कारणे आणि उपाय :

अण्णा हजारे यांनी स्थापन केलेल्या भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाच्या कार्याचा आढावा घेण्यापूर्वी भ्रष्टाचार म्हणजे काय? त्याची कारणे आणि त्यावरील उपाय याचे अध्ययन आपण करु.

निसर्गाने ज्या काही घटना, वस्तू आणि गुणधर्म निर्माण केले ते अतिशय उदात्त दृष्टिकोनातून निर्माण केले; परंतु भ्रष्टाचार ही प्रवृत्ती मानवी मनाची दुर्गंधी आहे. अतिलोभ, स्वार्थ आणि कष्ट न करण्याची प्रवृत्ती ही भ्रष्टाचाराला प्रेरणा देणारी साधने आहेत आणि पूर्ण जगात भ्रष्टाचाराचा वणवा इतका पेटला आहे, की त्यामध्ये उभे जग जळून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

देशाची क्रमांक दोनची व्यक्तीच जेव्हा भ्रष्टाचार करते आणि सकृत्‌दर्शनशी उच्च न्यायालयात सिध्द होऊनदेखील सर्व देशवासीय उघड्या डोळ्यांनी पाहतात तेव्हा कोणी कोणास काय उपदेश करावा हाच प्रश्न जनतेसमोर पडतो. या देशाचे रक्षक जेव्हा भक्षक बनतात, कुंपणच शेत खायला लागते, पुजारी जेव्हा मंदिरातील गाभाऱ्यातील मूर्तीचे मारेकरी बनतात, कायदे बनवणारेच कायदेभंग करतात, अशा वेळी उपाय शोधायचा कुठे ? आभाळच जेव्हा फाटते तेव्हा ठिगळ कसे लावयचे आणि कशासाठी? भ्रष्टाचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्वतंत्र न्यायालये स्थापन करावी लागतात, हीच आपल्या हिंदुस्थानची जगात सर्वश्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या लोकशाहीची शोकान्तिका आहे.

पारतंत्र्य जाईल आणि सर्वसुखसंपन्न स्वातंत्र्यपर्व येईल व जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण होतील असा आशावाद प्रत्येक भारतीयांच्या हृदयाच्या कुठल्या तरी कप्प्यात होता; परंतु स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रपूजेऐवजी व्यक्तिपूजेला उधाण आले आणि विशिष्ट व्यक्तीच्या हातात सत्तेची सूत्रे आली व त्यांनी सत्तेच्या माध्यमातून भ्रष्टाचाराचा वापर करुन संपुर्ण बहुजन समभाग भरडून काढला. भ्रष्टाचाराच्या प्रवृत्तीमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होण्याऐवजी केंद्रीकरण झाले आणि मग भ्रष्टाचाराच्या धुंदीत त्यांना या जनतेचा-राष्ट्राचा आणि या भूमीचाही विसर पडला. जन्माला आलेले प्रत्येक अर्भक भ्रष्टाचाराचा गुणधर्म अंगी घेऊन जन्माला येऊ लागले. कारण ज्या वातावरणात या अर्भकाचा पिंड घडतो, ते वातावरण भ्रष्टाचारी असल्याने तसे गुणधर्म त्याच्या शरीरात उतरतात. एका अर्भकाच्या मुठी बंद होत्या. खुप प्रयत्न करुनही या उघडत नव्हत्या, मानसशास्त्रज्ञाने पूर्ण परिस्थितीचा अभ्यास केला. त्या मुलासमोर एक मंगळसूत्र धरले व लगेच त्या बालकाने ते मंगळसुत्र घेण्यासाठी मुठी उघडल्या. कारण त्याचे आई-वडिल भ्रष्टाचारी होते. इतकी भ्रष्टाचाराची पाळेमुळे नसानसातं भिनू लागली आहेत.

भ्रष्टाचाराच्या नादात माणूस सत्त्व विसरला व डोळे असूनही आंधळा बनला. युरिया घोटाळा, खासदार लाच प्रकरण, चारा घोटाळा, क्रिकेट सट्टेबाजी, बोफोर्स प्रकरण अशी असंख्य प्रकरणे जगाच्या कानाकोपऱ्यात गाजली. तरीदेखील आजही समाज भ्रष्टाचाऱ्यांना आपला देव मानून पुजत आहे. पैशाचा लोभ आणि सत्तेची नशा चढली, की माणसाला नीती, अनीती यांचा विसर पडतो. विवेकाची जागा अविवेक घेतो आणि मग माणूस भ्रष्टाचार करु लागतो.

भ्रष्टाचार याचा अर्थ "भ्रष्ट आचार" असा होतो. मग असे शब्द आचरण प्रत्येक क्षेत्रात सुरु होते. आज असे एकही क्षेत्र नसेल, की जे पूर्णपणे भ्रष्टाचारमुक्त असेल. दुर्दैवाने आज असे म्हणावे लागत आहे, की भ्रष्टाचार हा एक लोकशाहीचा एक भाग बनला आहे आणि आपला देश भ्रष्टाचाराने पोखरुन निघत आहे. जगाच्या पाठीवर भ्रष्टाचारामध्ये भारताचा सातवा क्रमांक आहे. हेच या भूमीचे सर्वांत मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. आज भ्रष्टाचाराचे अपचन होण्याची वेळ आली तरी भ्रष्टाचारी लोकांनी भ्रष्टाचार थांबवला नाही. ही भूमी सुवर्णभुमी आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भारतीय स्वातंत्र्य हे बलिदानांचे स्वातंत्र्य आहे. मग आपण 'व्यर्थ न हो तयांचे बलिदान' हे ब्रीदच इतिहासजमा करत आहोत.[१]

अशाप्रकारे आपण भ्रष्टाचार म्हणजे काय ? व त्याच्या कारणांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. भारतातील भ्रष्टाचाराची एकूण स्थिती ज्येष्ठ समाजसुधारक अण्णा हजारे यांनी पाहिली तेव्हा त्यांनी भारताला भ्रष्टाचारमुक्त करण्याचा विडा उचलला. विविध क्षेत्रांत विविध पातळीवर होणारा भ्रष्टाचार ही भारताच्या विकासासाठी मोठी चिंतेची बाब आहे, हे ओळखून त्यांनी भारताला भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी, भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन प्रभावीपणे राबवण्यासाठी राज्यस्तरावर भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास हा विश्वस्त निधी स्थापन केला आहे. सदर संस्था ही स्वयंसेवी संस्था असल्याने संस्थेचे नियम, पोटनियम, मार्गदर्शक तत्वे, कार्यपध्दती भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन उभारणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांवर बंधनकारक राहणार आहे. हा विश्वस्त निधी संस्था

स्वच्छ, संयमी, धाडसी, तन-मनाने तरुण असलेल्या समाजसेवक व देशभक्त कार्यकर्त्यांची असणार आहे.

## ६.३ भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यास : लोककल्याणासाठी काळाची गरज

१५ ऑगस्ट १९७४ रोजी आपण स्वतंत्र झालो. पहिली दहा - बारा वर्षे सोडली, तर स्वातंत्र्याला भ्रष्टाचाराचे ग्रहण लागले. गेल्या ३०-३५ वर्षांत हे ग्रहण कलेकलेने वाढत गेले. आता तर भ्रष्टाचार नाही असे एकही क्षेत्र सापडणार नाही अशी अवस्था आहे. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, सरकारी स्वायत्त मंडळे, शासकीय संस्था, स्वायत्त संस्था, सहकारी संस्था, साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, शैक्षणिक संस्था या सर्व क्षेत्रांत भ्रष्टाचाराने उग्र रुप धारण केले आहे. शाळा, विद्यालय, महाविद्यालय, बी.एड्., डी.एड., निवड मंडळ, एम.पी.एस.सी. परीक्षा मंडळ, सेवा नियोजन कार्यालय या ठिकाणी तर गुणवंत सुशिक्षित बेरोजगार युवकांना डावलून भ्रष्ट मार्गाने निवड केली जाते. भ्रष्टाचाराची झळ कामगारवर्गालाही बसत आहे. त्यामुळे अनेक बिकट प्रश्न निर्माण झाले आहेत. शेतकरी वर्गालाही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. ज्यांचे संसार धरणात बुडाले, त्या धरणग्रस्तांचे अनेक वर्षांनंतरही पुनर्वसन झालेले नाही. प्रत्येक विकासकार्यात साखळी पध्दतीने जो भ्रष्टाचार सुरु झाला आहे, तो फारच समाजघातक ठरु पाहत आहे, जनतेच्या खिशातला कररुपाने गोळा होणारा पैसा शासकीय तिजोरीत जमा होतो. साखळी

पध्दतीने होणारा भ्रष्टाचार हा शासनाच्या म्हणजे पर्यायाने जनतेच्या तिजोरीवर दिवसाढवळ्या टाकलेला दरोडाच म्हणावा लागेल असे अण्णा हजारे म्हणतात.

अधिकांश ठिकाणी भ्रष्टाचार पध्दतशीरपणे व सफाईदारपणे चालू आहे. त्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करुन जनतेच्या डोळ्यात धूळ फेकली जात आहे. सर्वच क्षेत्रांत यां अनिष्ट व दुष्ट प्रवृत्ती वाढत चालल्या आहेत. नोकरशाहीतले काही कर्मचारी, काही अधिकारी व सत्तेतले भागीदार पुढारी भ्रष्टाचारात सामान्य माणसाला कोंडीत पकडीत आहेत. प्रत्येक नागरिकाला भारतीय घटनेने दिलेले अधिकार पायदळी तुडवून, त्यांच्यावर अन्याय केला जात आहे. सामान्य माणसाचा छळवाद सुरु झाला आहे. भ्रष्टाचारातून निर्माण झालेल्या काळ्या पैशाने महागाई सारखी वाढत आहे. या महागाईत सामान्य माणसाला जगणे अवघड झाले आहे. त्यामुळे दरवर्षी दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या सारखी वाढत आहे. शासकीय अंदाजपत्रकातील बरीचशी रक्कम भ्रष्टाचारात गडप झाल्याने येणारी तूट भरुन काढण्यासाठी जिझिया करासारखी करवाढ जनतेवर लादली जात आहे. त्यामुळे सामान्य माणूस हतबल झालेला आहे, निराश झालेला आहे. भ्रष्टाचारी व्यवस्थेशी लढण्याचे त्राण गरिब माणसात राहिलेले नाही. त्यामुळे तो मूग गिळून बुक्क्यांचा मार सहन करीत आहे. त्याशिवाय जनतेपुढे दुसरा पर्याय नाही.

आज दरवर्षी भ्रष्टाचारामुळे केंद्र व राज्य सरकारांचा दहा हजार कोटी रुपयांचा तोटा होतो असे सी.बी.आयचे माजी संचालक श्री. के माधवन यांनी दि स्टेटसमन या वृत्तपत्रातील एका लेखात

लिहिले आहे. यावरुन भ्रष्टाचाराचा बकासुर देशात कसा थैमान घालतो आहे ते दिसते. अखेर हा सारा पैसा जनतेचाच असतो; म्हणून भ्रष्टाचाराविरुध्द आता जनतेने जागृत झाले पाहिजे.

आडदांडपणाने राजरोस भ्रष्टाचार करणाऱ्या अनिष्ट प्रवृत्तींना पायबंद घालण्यासाठी जनतेने उभे राहिले पाहिजे. त्यासाठी जनआंदोलन उभारणे ही काळाची गरज बनली आहे. हे जनआंदोलन चालविणे एकट्यादुकट्याचे काम नाही. त्यासाठी जनतेने संघटित होण्याची गरज आहे. गाव, तालुका, जिल्हा व राज्यपातळीपर्यंत लोकसंघटनातून भ्रष्टाचाराविरुध्द जनआंदोलन उभे राहिले पाहिजे. या जनआंदोलनाव्दारे अहिंसात्मक व सनदशीर मार्गाने प्रखर लढा दिला पाहिजे. या लढ्यात भ्रष्टाचाराची चीड असणाऱ्या समविचारी माणसांनी सहभागी झाले पाहिजे. तनमनधनाने विचारपूर्वक हे कृतिआंदोलन पुढे नेले पाहिजे, तरच भ्रष्ट प्रवृत्तीला आळा बसेल. देशाच्या अर्थव्यवस्थेला जडलेला भ्रष्टाचाराचा कर्करोग नवा नाही. तो जुनाट आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराचे निर्मूलन ही सहजशक्य गोष्ट नाही. ही फार अवघड व प्रदीर्घ चालणारी क्रिया आहे; परंतु जनतेने संघटीतरीत्या प्रयत्न केले तर ते अशक्य नाही. त्यासाठी ग्राम, तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर चारित्र्यशुध्द माणसांच्या समित्या स्थापन झाल्या पाहिजेत असे अण्णा हजारे म्हणतात. या समित्यांनी कार्यक्रम आखल्यास त्यांच्या पाठीशी सामान्य लोक निश्चितपणे उभे राहतील. त्यामुळे माझ्यासमोर बसलेली व्यक्ती एकटी नसून, त्या व्यक्तीच्या पाठीशी जनशक्ती आहे, याची जाणीव सरकारी माणसांना होऊन सामान्य माणसांचे काम डावलण्याची त्यांची हिंमत होणार नाही.

सामान्य माणसांची नाडवणूक बंद करुन त्याला दिलासा देण्याबरोबरच शासकीय योजनांमधील साखळी पध्दतीने चाललेला भ्रष्टाचारही समितीने शोधला पाहिजे. त्याचे पुरावे जमा करुन त्याची चौकशी करण्याची मागणी करावी. त्या मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास भ्रष्टाचाऱ्याच्या घरासमोर भजन, कीर्तन, जागरण गोंधळाचे कार्यक्रम हाती घ्यावेत. भ्रष्टाचाऱ्याच्या नावाने फलक हातात घेऊन मोर्चा काढावा, धरणे धरावे. यातून भ्रष्टाचाऱ्यांची मानहानी होईल, त्यामुळे भ्रष्टाचारास आळा बसू शकेल. तसेच काही समाजसेवी वकील मंडळी, निवृत्त न्यायाधीश व इतर खात्यातील अनुभवी व्यक्तींचे सहकार्य घेऊन भ्रष्टाचाराची गंभीर प्रकरणे पुराव्यासह लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे चौकशीसाठी दाखल करावीत. काही प्रकरणे न्यायालयात दाखल करुन न्याय मागावा. अशा विविध मार्गांनी भ्रष्टाचाराला आळा घालण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे.

माहितीचा अधिकार, ग्रामसभेला जादा अधिकार, बदल्यांचा कायदा व दप्तरदिरंगाईचा कायदा करण्यासाठी आंदोलनाच्या वतीने गेल्या आठ - दहा वर्षांपासून प्रयत्न केले गेले. त्यामुळे वरील कायदे झालेले आहेत. पुढील काळात या कायद्यांची माहिती सर्वसामान्य जनतेला करुन दिली पाहिजे. त्यासाठी लोकशिक्षण, लोकजागृती व लोकसंगठन करुन अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे. त्यासाठी तरुणांनी पुढाकार घेऊन बलशाली भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे म्हणतात.[२]

## ६.४ भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाचे ध्येय :

भारताच्या संविधानाच्या प्रास्ताविकात ज्या ध्येयपूर्तीची मुहूर्तमेढ रोवली आहे, ती ध्येये मूर्त स्वरुपात येण्यावर भारतातील सामान्य जनतेचे कल्याण अवलंबून आहे; परंतू दुर्देवाने आज ती ध्येये सामान्य माणसांपासून दूर जात आहेत. सामान्य जनता दुर्दैवी हलाखीच्या खाईत लोटली जात आहे. त्या ध्येयांची पूर्ती होण्यासाठी आजच्या घडीला समाजपरिवर्तनाची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी विकासाची विविध कामे करणे व भ्रष्टाचाराचे निर्मूलन करणे आवश्यक आहे. समाजपरिवर्तनासाठी भारतासारख्या खंडप्राय देशात ग्रामविकास झाला पाहिजे. ग्रामविकास व समाजपरिर्तनाचा केंद्रबिंदू सामान्य माणूस आहे. हा सामान्य माणूस निर्भय , सत्शील व स्वाभिमानी असल्याखेरीज हा उद्देश साध्य होणार नाही. यासाठी सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे निर्मूलन केले पाहिजे, तसेच जात, धर्म, पंथ, लिंग आदी भेदांमुळे आपल्या समाजात होत असलेले अन्याय नष्ट करुन सर्वांना विकासाची संधी दिली पाहिजे. सामान्य माणसांचा आत्मविश्वास जागृत झ ाल्यावरच तो समाजातील अनिष्ट प्रवृत्तीशी संघर्ष करुन समाजपरिवर्तन घडवून आणू शकेल. समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत सार्वजनिक कामकाज स्वच्छ व पारदर्शक असण्याची खात्री झ ाल्याशिवाय सामान्य माणूस या कामात रस घेणार नाही. आजची परिस्थिती लक्षात घेता या कामात भ्रष्टाचाराचा फार मोठा अडसर निर्माण होत आहे. यासाठी भ्रष्टाचाराविषयी असलेली चीड, जागृत व संघटित करुन समाजपुरुषाला पोखरणारी ही कीड दूर करण्यासाठी भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाची

आज नितांत गरज आहे. म्हणून ‘भ्रष्टाचार’विरोधी जनआंदोलन न्यास ही संस्था खालील उद्देशांसाठी स्थापन करण्याचे ठरविले आहे.

## ६.५ भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाची उद्दिष्टे :

समाजपुरुषाला पोखरणारी ही भ्रष्टाचाराची कीड दूर करण्यासाठी भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाची आज नितांत गरज भासते आहे. म्हणूनच ‘भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास’ या संस्थेने आपली काही उद्दिष्टे निश्चित केली आहेत, ती खालीलप्रमाणे आहेत :

१. भारताच्या संविधानाच्या प्रास्ताविकात नमूद केलेल्या तत्त्वावर आधारित समाजाची उभारणी करणे.
२. समाजातील सर्व प्रकारच्या विषमतेविरुध्द जनशिक्षण, जनसंघटन याव्दारे कार्य करुन सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करणे.
३. सर्व स्तरांतील भ्रष्टाचार, अन्याय व दडपशाही यांच्या निर्मूलनासाठी प्रशिक्षण, न्यायालयात दाद मागणे, कृती कार्यक्रम इ. विविध उपाय योजून शांततामय व लोकशाही मार्गाने जनआंदोलन उभारणे.
४. स्वराज्याचे सुराज्य बनविण्यासाठी आवश्यक ते सर्व उपक्रम राबविणे.

५. जनतेला निर्भय व कार्यक्षम बनविण्यासाठी लोकशिक्षणाचे विविध उपक्रम राबविणे, आम जनतेच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आदी मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी सर्वांगीण विकासकार्याला चालना देणे.

६. राष्ट्रीय चारित्र्य घडविण्यासाठी व लोकशाही निर्णय प्रक्रिया मजबूत करण्यासाठी विविध मार्गांने सतत प्रयत्न करणे.

७. संस्थेस पक्षीय राजकारणापासून अलिप्त ठेवून लोकशिक्षणाचे व भ्रष्टाचार निर्मूलनाचे कार्य करणे.[३]

अशा प्रकारे वरील काही उद्दिष्टे 'भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास' या संस्थेने निश्चित केली होती. त्या उद्दिष्टांसाठी ती स्थापन करण्यात आली होती.

**६.६ 'भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाची मार्गदर्शक तत्त्वे :**

**जिल्हा / तालुका शाखा / समित्यांकरिता मार्गदर्शक तत्त्वे :**

**शब्दाची व्याख्या :**

***१) जिल्हा शाखा / समिती -***

भ्रष्टाचारविरोधी जन आंदोलन न्यास, मु.पो. राळेगणसिध्दी ता. पारनेर, जि. अहमदनगर यांची जिल्हास्तरीय कार्य करणारी व मध्यवर्ती न्यासाच्या राज्य समितीच्या कार्यकारी मंडळाच्या (Exeutive Body) मान्यतेने कार्य करणारी शाखा होय.

***२. (अ)जिल्हा कार्यकारी मंडळ -***

जिल्हा स्तरावर कार्य करणारे पदाधिकारी, सभासद, तालुका कार्यकारी मंडळ : तालुका स्तरावर काम करणारे पदाधिकारी, सभासद.

***३. जिल्हा स्तरावरील शहर शाखा :***

राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात कार्य करणाऱ्या जिल्हास्तरावरील शहरांना शहर शाखा असे संबोधण्यात येईल. जिल्हा शाखेसाठी असणारे सर्व नियम यां शाखांना लागू होतील. उदा. पुणे, नागपूर.

***४. सभासद :***

मध्यवर्ती न्यासाने घालून दिलेली मार्गदर्शके मान्य असणारी व सभासद अर्ज भरुन दिल्यानंतर, सभासद शुल्क भरलेली व्यक्ती व जिल्हा, तालुका स्तरावर मंजुरी मिळाली.

***२) कार्यक्षेत्र :***

महाराष्ट्र राज्यातील संबंधित जिल्हा मुख्य कार्यालय :

जिल्ह्याच्या ठिकाणी राहील किंवा जिल्हा कार्यकारी मंडळाच्या ठरावाने आवश्यकतेनुसार कार्यालयाचे ठिकाण बदलता येईल. जिल्हा पातळीवरील शाखा ही भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास, मु.पो. राळेगणसिध्दी ता. पारनेर, जि. अहमदनगर संस्था नोंदणी क्रमांक महा/४६६२/अहमदनगर, दि.१७/०६/१९९७ सा.वि.नों.क्रं. एफ ४१३३/अहमदनगर दि.०५/११/१९९७ ची जिल्हा शाखा समजण्यात येईल.

***३)	हिशेबाचे वर्ष :***

आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्चपर्यंत.

***४)	सभासद व त्याची नोंदणीची पध्दत :***

कोणत्याही प्रकारचे सभासद होण्यासाठी १८ वर्षांवरील कोणत्याही स्त्री अथवा पुरुष नागरिकाने राज्य समितीने तयार केलेल्या विहित नमुन्यात जिल्हा शाखेच्या अध्यक्षांकडे प्रतिज्ञापत्र व चरित्र-दाखल्यासह अर्ज करावा. कोणत्याही प्रकारचे सभासदत्व देण्याचा अधिकार जिल्हा कार्यकारी मंडळाकडे असेल. सभासदत्वाचा अर्ज मंजूर झाल्यास सभासदास कळविण्यात येईल. सभासदत्व मंजूर झाल्यास दिलेल्या मुदतीत वार्षिक वर्गणी रुपये ५०/- न्यासाच्या जिल्हा शाखेच्या कार्यालयात भरावी. कोणत्याही सभासदाने, संसद, विधिमंडळ, महापालिका, नगर परिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद इ. निवडणुकीस राजकीय पक्ष किंवा

पार्टीमार्फत उभे राहता कामा नये.अगर नियुक्त होता कामा नये मात्र सभासदास अपक्ष म्हणून कोणतीही निवडणूक लढविता येईल; पण निवडणूकीला उभे राहणाऱ्या सभासदाचा प्रचार करण्याचे बंधन जिल्हा शाखेवर किंवा इतर सभासदांवर असणार नाही. सभासद वर्गणीमध्ये व नियमात बदल करण्याचा अधिकार राज्य विश्वस्त मंडळास राहील.

***५) सभासदाचे प्रकार :***

**१. राज्य समिती सदस्य :-**

संस्था स्थापन करताना ज्ञापनावर सही केलेले व सध्या राज्यसमितीवर कार्य करत असलेले पदाधिकारी किंवा राज्य समितीने समिती सभासद म्हणून मान्यता दिलेली व्यक्ती आणि जिल्हा स्तरावरील जिल्हा शाखेचा अध्यक्ष हा राज्य समितीचा सभासद असेल. त्याची निवड/ नियुक्ती राज्य कार्यकारी मंडळाव्दारे करण्यात येईल किंवा जिल्ह्यातील सभासद जिल्ह्यातील व्यक्तीच्या नावाची राज्य समितीकडे शिफारस करु शकतील.

**२. वार्षिक सभासद :-**

सभासद-अर्ज मंजूर झाल्यानंतर रुपये ५०/- ची वर्गणी भरुन सभासद होता येईल.

## ३. हितचिंतक सभासद :-

ज्या सभासदांना संस्थापक अण्णा हजारे यांचे विचार मान्य आहेत व आर्थिक मदत करावी असे वाटत असेल अशा व्यक्तींनी देणगी स्वरुपात मदत करुन सभासदत्व स्वीकारता येईल. त्यांना कोणतेही अधिकार असणार नाहीत.

## ***६) सभासदत्व रद्द होणे :***

पुढीलपैकी कोणतेही एक किंवा अधिक कारणाने सभासद आपल्या पदावर राहण्यास अपात्र ठरवुन त्याची जागा रिकामी होईल.

१) मृत्यू, २) राजीनामा, ३) काम करण्यास असमर्थता अथवा नकार, ४) नैतिक गुन्ह्याबद्दल सक्षम न्यायालयाने शिक्षा देणे, ५) वेड लागणे, ६) नादारी ७) पूर्व सूचना न देता, तीन बैठकांस गैरहजर राहिल्यास, ८) संस्थेच्या ध्येय व उद्दिष्टाविरुध्द कार्य केल्यास, ९) प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केल्यास, १०) वार्षिक वर्गणी मुदतीत न भरल्यास नूतनीकरण होणार नाही, (१ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत) त्याला कार्यकारिणीमध्ये पदाधिकारी म्हणून कार्य करता येणार नाही. त्याचप्रमाणे त्याच्या मतदानाचा हक्क वर्षभर स्थगित होईल.

एखाद्या सभासदाचे जाणूनबुजून सभासदत्व रद्द होणार नाही याची काळजी जिल्हा अध्यक्षासह जिल्ह्यातील इतर ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी घ्यावी. सभासद पद देणे अथवा रद्द करण्याबाबत निर्णय जिल्हा समितीने घ्यावा. याबाबत वाद उद्‌भवल्यास अंतिम निर्णय राज्य कार्यकारिणी घेईल.

वरील कलम सहा प्रमाणे रिकाम्या झालेल्या जागेवर नवीन सभासदाची अपात्र ठरलेल्या सभासदाच्या कालमर्यादेपर्यंत कार्यकारी मंडळ नेमणूक करेल.

### *७) सर्वसाधारण सभा व तिचे अधिकार व कार्य :*

जिल्ह्यातील सर्व सभासदांची वर्षातून एकदा जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा कार्यकारी मंडळ ठरवील त्या ठिकाणी सभा होइल. सभेची शक्य असल्यास वर्तमानपत्रातून जाहीर प्रसिध्दी करावी. जिल्हास्तरीय कार्यकारी मंडळाने केलेल्या कामाचा आढावा व पुढील कार्यक्रम निश्चित करता येइल. या सभेत सभासदांना जिल्हास्तरीय शाखा कामकाजांच्या बाबत आपले विचार मांडता येतील व सूचना करता येतील. वार्षिक हिशेब मंजूर करणे, नवीन खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे, आपल्या कार्यात आलेल्या अडचणींवरील उपाय सुचविणे, राज्य समितीकडे आपला अहवाल पाठविणे, जिल्ह्यातील कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करणे, कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयावर व कार्यावर नियंत्रण ठेवणे, वेळोवेळी येणाऱ्या प्रस्तावावर निर्णय घेणे, राज्य कार्यकारी मंडळाकडून आलेल्या सर्व सूचनांचे व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे.

### *८) सर्वसाधारण सभेची सूचना आणि गणसंख्या :*

सर्वसाधारण सभेची सूचना सर्व सभासदांना सभेपूर्वी २१ दिवस अगोदर दिली पाहिजे. त्याचप्रमाणे शक्य असल्यास वर्तमानपत्रातून विनामूल्य प्रसिध्दी करावी. या सभेकरिता १/३

सभासदांची गणसंख्या आवश्यक राहील. गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यानंतर अध्यक्षांना तीच सभा, त्याच ठिकाणी अर्ध्या तासांने घेता येईल. अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

### ९) *विशेष सर्वसाधारण सभा :*

जिल्हास्तरीय विशेष सर्वसाधारण सभा ही आवश्यकतेनुसार बोलावली जाईल. त्याची सूचना सभासदांना ७ दिवस अगोदर दिली पाहिजे. १/३ गणसंख्या आवश्यक राहील. गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यानंतर अध्यक्षांना तीच सभा, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेता येईल. अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. अशा सभा वर्षातून तीन वेळा बोलावता येतील.

### १०) *जिल्हास्तरीय कार्यकारी मंडळ/ पदाधिकाऱ्यांची रचना :*

१. जिल्हास्तरीय कार्यकारी मंडळ सदस्यांची किमान संख्या ७ राहील व कमाल संख्या त्या जिल्ह्यातील तालुक्याच्या संख्येवर अवलंबून असेल; पण ती संख्या कोणत्याही परिस्थितीत २१ पेक्षा जास्त नसेल.

२. जिल्हास्तरीय कार्यकारी मंडळाच्या सभासदांमध्ये राज्य समितीने निवडलेला किंवा नियुक्त केलेला १ अध्यक्ष असेल व आर्थिक व्यवहार पाहण्यासाठी ज्यांच्यावर जबाबदारी सोपविली आहे, अशा दोन पदाधिकाऱ्यांची संख्या कार्यकारिणीमध्ये असेल.

**कार्यकारी मंडळाची रचना :**

अध्यक्ष -१, उपाध्यक्ष -१ (जिल्ह्याचे कार्य दोन भागांत चालणार असेल तर दोन), सचिव १, सहसचिव १ (जिल्हा कार्य दोन भागांत चालणार असेल तर दोन), खजिनदार १ व बाकी दोन सदस्य, प्रत्येक तालुक्यातील अध्यक्ष हा जिल्हा कार्यकारिणीचा सभासद असेल. जिल्ह्यातील तालुका अध्यक्ष हा जिल्हा कार्यकारिणीमध्ये पदाधिकारी म्हणून नेमण्यात येऊ नये.

**कार्याध्यक्ष :**

जिल्ह्यातील सर्व सभासदांच्या मान्यतेने जिल्ह्याचा कार्याध्यक्ष म्हणून जिल्ह्यातील सभासदांना आपला प्रतिनिधी निवडता येईल. सदरची बाब त्या जिल्ह्याची विशेष बाब म्हणून विचारात घेता येईल.

***११) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत :***

१. कार्यकारी मंडळाची कालमर्यादा ही एक वर्षाची राहील. नवीन कार्यकारिणी अस्तित्वात येऊन कार्यभार स्वीकारेपर्यंत जुनी कार्यकारिणी कार्यरत राहील. दरवर्षी सभासद वर्गणी भरणाऱ्या सभासदामधूनच कार्यकारी मंडळाची निवड होईल. ज्या सभासदांनी दिनांक ०१

एप्रिल ते ३० एप्रिलपर्यंत सभासदांची वार्षिक वर्गणी भरली असेल अशा सभासदानाच जिल्हा / तालुका कार्यकारिणीत मतदानाचा वा कार्यकारिणीमध्ये पदाधिकारी म्हणून निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार राहील.

२. जिल्हा अध्यक्षांची नियुक्ती ही राज्य समितीकडून होत असल्याने त्याची मुदत ही पाच वर्षाची असेल; पण राज्य समिती जिल्हा अध्यक्षाला मुदतीपूर्वी त्याचा वार्षिक कार्यभार पाहून केव्हाही पदमुक्त करु शकेल. अध्यक्षांचीदेखील वार्षिक सभासद वर्गणी ही वर दिलेल्या मुदतीत आली पाहिजे.

३. जिल्ह्यातील सभासदांनी कार्यकारिणी मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांची म्हणजेच अध्यक्षासह उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, खजिनदार अशा पाच अधिकाऱ्यांची नावे सुचवावीत. कार्यकारी मंडळाला राज्य समितीची मान्यता मिळाल्यानंतर ते कार्यकारी मंडळ त्या आर्थिक वर्षाकरिता कार्यरत होईल. दरवर्षी ३१ मेपूर्वी नवीन कार्यकारी मंडळाची निवड व्हावी किंवा सर्वसंमतीने आहे तेच कार्यकारी मंडळ अध्यक्षासहित पुनर्नियुक्तीस पात्र राहील. जर जिल्ह्यातील कार्यकारी मंडळाबाबत काही अडचणी/ तक्रारी असतील तर राज्य समिती निरीक्षक पाठवून जिल्हास्तरीय कामकाज सुरळीतपणे चालू ठेवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करील किंवा जिल्ह्यातील कार्य तात्पुरते/ कायमचे स्थगित ठेवील.

### *१२) जिल्हा कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :*

वार्षिक सभासद शुल्क भरलेल्या जिल्ह्यातील सभासदामधून कार्यकारी मंडळ तयार होईल. त्यामधूनच एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, एक सचिव, एक सहसचिव, एक खजिनदार व इतर सदस्य निवडले जातील.

**१. जिल्हा अध्यक्ष :**

हा जिल्हा समिती व राज्य समिती यांमधील समन्वयाचे व संपर्काचे माध्यम म्हणून कार्यरत राहिल. राज्य समितीच्या सल्ल्याने जिल्ह्यातील कारभार करण्याची जबाबदारी त्याच्यावर राहील. जिल्हा समितीची ज्या वेळेस बैठक असेल त्या वेळी त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवील. एखाद्या विषयावर समसमान मते पडतील तेव्हा त्याला निर्णायक मताचा अधिकार राहील. जिल्ह्यातील कामकाजावर देखरेख ठेवणे, पदाधिकाऱ्यांना सूचना देणे, राज्य समितीकडे त्रैमासिक अहवाल पाठविणे, राज्य समितीने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे, परिपत्रकाप्रमाणे व मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे जिल्ह्यांचे कामकाज करणे.

**२. उपाध्यक्ष :**

अध्यक्षांच्या अनुपस्थितीत जिल्ह्याचे उपाध्यक्ष कार्यकारी मंडळाच्या बैठकीचे अध्यक्षपद सांभाळतील. ज्या ठिकाणी दोन उपाध्यक्ष असतील त्या ठिकाणी वयाने वरिष्ठ असलेल्या

उपाध्यक्षाला त्या बैठकीचे अध्यक्षपद सांभाळता येईल व त्यांनादेखील अध्यक्षाप्रमाणेच त्या बैठकीचे अधिकार असतील.

**३. सचिव :**

जिल्ह्यातील समितीचा पत्रव्यवहार पाहणे, अध्यक्षाच्या अनुमतीने पत्रव्यवहारास उत्तर देणे व निर्णय घेणे ही जबाबदारी सचिवांची राहील. जिल्हा बैठकीचे वृत्तांत लिहिणे, अध्यक्षांच्या अनुमतीने जिल्हा समितीच्या सभासदांसाठी बैठकीच्या सूचना काढणे हे सचिवाचे काम राहील. अध्यक्षाच्या अधिकाराखाली सचिव जिल्हा समितीच्या कामकाजावर देखरेख ठेवून वेळोवेळी आपला अहवाल जिल्हा समितीला व त्याची एक प्रत राज्य समितीकडे माहितीकरिता पाठवीत राहील.

**४. सहसचिव :**

अध्यक्षाच्या मार्गदर्शनानुसार सचिवांना त्यांच्या कामात मदत करतील. ज्या जिल्ह्यात दोन उपाध्यक्ष आहेत अशा वेळी दोन्ही उपाध्यक्ष आपल्या सोयीकरिता दोन सहसचिवांची पदे तयार करतील; पण दोन्ही सहसचिवांनी आपापला अहवाल जिल्ह्याच्या सचिवाकडे पाठवावा.

## ५. खजिनदार :

जिल्हा समितीचे हिशेब ठेवणे ही खजिनदाराची जबाबदारी राहील. जिल्हा समितीला मिळालेल्या सर्व रकमांचा व निधींचा हिशेब ठेवणे, व्यवहार पाहणे, प्रत्येक खर्चाचे व्हाऊचर्स घेणे, वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन जिल्हा कार्यकारिणीपुढे मांडणे, जिल्हा समितीची हिशेब पत्रके तयार करुन ती कार्यकारी मंडळापुढे मांडून शक्य असल्यास कार्यकारी अधिकाऱ्याकडून तपासून घ्यावीत. किंवा अंतर्गत हिशेब तपासणीमार्फत तपासून घेऊन राज्य समितीकडे पाठवून द्यावे. त्याचप्रमाणे ही कामे स्वतः खजिनदार करतील किंवा इतर व्यक्तीमार्फत करुन घेतील; परंतु या कामाची सर्व जबाबदारी त्याची राहील.

## ६. सभासद :

जिल्हा कार्यकारिणीच्या सर्व कामांत सहकार्य करणे, बैठकांमध्ये व मतदानामध्ये भाग घेणे, तालुकास्तरीय अडीअडचणी जिल्हा समितीकडे मांडणे.

## ***१३) जिल्हा कार्यकारी मंडळाची सभा आणि मागणीची सभा :***

जिल्हा कार्यकारी मंडळाची बैठक दर दोन महिन्यांतून एकदा होईल. अध्यक्षांना आवश्यकता वाटल्यास कार्यकारी मंडळाची मासिक सभा बोलाविता येईल. कार्यकारी मंडळीतील किमान पाच जणांनी मागणी केल्यास मागणीची सभा घेण्यात येईल.

## *१४) जिल्हा कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना आणि गणसंख्या :*

दुमाही बैठकीची सूचना किमान तीन दिवस अगोदर पोचेल, अशा हिशेबाने कार्यकारी मंडळातील सभासदांना अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंगने त्यांनी नोंदविलेल्या पत्त्यावर पाठविली जाईल किंवा कार्यकारी मंडळ महिन्यातील एखादी तारीख किंवा एखादा वार उदाहरणार्थ महिन्यातील दुसरा किंवा तिसरा शनिवार किंवा रविवार, त्या बैठकीची वेळ, स्थळ निश्चित करतील व त्याप्रमाणे बैठकीचे आयोजन केले जाईल.

**गणसंख्या :**

जिल्ह्यातील कार्यकारी मंडळाच्या बैठकीसाठी किमान सात सभासद ही गणसंख्या राहील. गणसंख्यापूर्ती न झाल्यास बैठकीच्या नियोजित वेळेनंतर त्याच ठिकाणी तहकूब बैठक होऊ शकेल. त्यास गणसंख्यापूर्तीची आवश्यकता भासणार नाही. अशा तहकूब बैठकीत फक्त विषयपत्रिकेतील विषयावरच निर्णय घेतले जातील.

**मागणीची सभा :**

जिल्हा कार्यकारी मंडळाचे किमान पाच सभासदांनी अध्यक्षाना पत्र लिहून विशिष्ट विषयाबाबत कार्यकारी मंडळाची बैठक बोलावण्याची मागणी केल्यास पत्र मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत अध्यक्ष विश्वस्त मंडळाची बैठक बोलावतील. त्यांनी तसे न केल्यास सभेची मागणी करणाऱ्या समिती सदस्याला वरील कलम १४ चे पालन करुन न्यासाच्या कार्यालयात बैठक बोलवता येईल. व या बैठकीत घेण्यात येणारे निर्णय वैध राहतील. मात्र बैठकीत नमूद केलेल्या विषयांखेरीज इतर विषयांवर निर्णय घेता येणार नाहीत.

***१५) जिल्हा कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :***

१. जिल्हा कार्यकारी मंडळाची कालमर्यादा ही एक वर्षाची राहील. वार्षिक सभासद वर्गणी भरणाऱ्या सभासदांमधूनच कार्यकारी मंडळाची निवड होईल. ज्या सभासदांनी दरवर्षी दिनांक १ एप्रिल ते ३० एप्रिलपर्यंत सभासदत्त्वाची वार्षिक वर्गणी भरलेली असेल त्या सभासदास जिल्हा/ तालुका कार्यकारिणीमध्ये मतदानाचा व पदाधिकारी म्हणून निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार राहील. निवडणुकीसंबंधी राज्य समिती वेळोवेळी जे आदेश देतील किंवा मार्गदर्शक तत्त्वे पाठवतील त्याप्रमाणे निवडणूक होईल. निवृत्त होणारे पदाधिकारी फेरनिवडणुकीस उमदेवार म्हणून पात्र असतील.

२. जिल्हा कार्यकारी मंडळाला राज्य समितीने मान्यता दिल्यानंतरच कार्यकारी मंडळ अस्तित्वात येईल.

३. जिल्ह्यातील सभासद दरवर्षी आवश्यकता वाटत असेल तर अध्यक्षाची नव्याने निवड करेल किंवा त्यांची पुनर्नियुक्ती राज्य समितीमार्फत केली जाईल किंवा जिल्ह्यातील इच्छुक सभासदांकडून अध्यक्षपदासाठी नावे मागविण्यात येतील व त्यामधून राज्य समिती एका व्यक्तीची जिल्हा अध्यक्ष म्हणून नियुक्ती करील.

४. संस्थापक अण्णा हजारे यांची विचारसरणी व ध्येयधोरणाने कारभार चालणार असेल तर आंदोलनाला अपेक्षित यश प्राप्त होईल, अन्यथा राजकीय पक्ष, पार्ट्याप्रमाणे पदासाठी ओढाताण होणार असेल तर मात्र जिल्ह्यातील शाखा पूर्णपणे बंद करण्याचे अधिकार हे राज्य समितीने राखून ठेवले आहेत. राष्ट्र व राज्य उभारणीसाठी कार्ये करावयाचे असल्याने निःस्वार्थी व निष्पक्षपातीपणे कार्य करीत राहिले पाहिजे.

### ***१६) जिल्हा कार्यकारिणीमधील रिक्त पदे भरणे बाबत :***

जिल्हा कार्यकारिणीमधील रिकाम्या झालेल्या जागांवर कार्यकारी मंडळ बहुमताने योग्य वाटेल अशा सक्षम व पात्र सभासदास नियुक्त करील. नवीन जागेवर रिक्तपदाच्या कालमर्यादेपुरती कार्यकारी मंडळ नेमणूक करील.

## *१७) जिल्हा कार्यकारी मंडळाचे अधिकार आणि कर्तव्ये :*

१. मध्यवर्ती न्यास ज्या उद्देशाने व घटनेने निर्माण झालेला आहे, त्याच्या उद्दिष्टपूर्तीसाठी सर्व प्रकारचे निर्णय घेण्याचा व ते राबविण्याचा व त्याबाबत सर्व प्रकारची कारवाई करण्याचा अधिकार जिल्हा कार्यकारी मंडळास राहील.

२. जिल्हा कार्यकारी मंडळ राज्य समितीच्या देखरेख, नियंत्रण व मार्गदर्शनाखाली चालेल. राज्य समितीच्या आलेल्या सूचना व मार्गदर्शनाने जिल्हास्तरीय समिती जिल्ह्यात कार्यरत राहील.

३. जिल्ह्यातील कामकाजावर देखरेख ठेवणे, पदाधिकाऱ्यांना सूचना करणे.

४. जिल्हा समिती तालुका स्तरावर कार्यकारी मंडळ स्थापन करील व त्यांना साहाय्य करील. त्याचप्रमाणे जमा होणारी सभासद वर्गणी व देणगीमधून जिल्ह्याचे कामकाज चालेल.

५. कार्यालयीन कामकाज पूर्ण करण्याकरिता सेवकांच्या नेमणूका करणे, मानधन ठरविणे इ. अधिकार राहतील; पण त्या सेवकांची कोणतीही जबाबदारी राज्य समितीवर राहणार नाही. न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास त्यास जिल्हा कार्यकारिणी जबाबदार असेल.

६. नैमित्तिक समिती : जिल्हातील कामाच्या सोयीकरिता वेळोवेळी आवश्यक त्या विषयावर वेगवेळ्या समित्या नेमण्याचा अधिकार असेल. समितीच्या अहवालावर कार्यकारिणी निर्णय घेईल व तो निर्णय जिल्हा कार्यकारी मंडळ अमलात आणतील.

७. तालुका/ जिल्हा परिषद/ पंचायत गट पातळीपर्यंत समित्या तयार करण्याचे काम जिल्हा कार्यकारी मंडळाला करावे लागेल. जिल्हा शहर समितीला, प्रत्येक वॉर्डात समित्या तयार कराव्या लागतील.

८. जमा होणाऱ्या सर्व निधीचा हिशेब ठेवून वेळेवर राज्य समितीकडे पाठविणे, जिल्हास्तरीय समितीने जमा होणाऱ्या निधीमधून राज्य समितीकडे राज्याचा कार्यालयीन कारभार चालविण्यासाठी देणगी कोणत्याही परिस्थितीत दरवर्षी १५ मेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

अ) जिल्हास्तरीय शाखा रुपये ११००/-

ब) जिल्हास्तरीय शाखा रुपये ११००/- (महानगरपालिका दोन)

क) तालुकास्तरीय शाखा रुपये ५५०/-

ड) तालुकास्तरीय शाखा (शहर) रुपये ५५०/-

(नगरपालिका) ज्या जिल्ह्यात/ तालुक्यात महिला शाखांना स्वतंत्रपणे कार्य करण्याची मान्यता आहे, त्यांना देखील वरील नियम कलम १० व कलम क्र. १७८८ लागू असेल.

**आर्थिक बाबींबाबत :**

अ) जिल्हा शाखांना राज्यसमितीकडून वेळोवेळी देणगी पावती पुस्तके घ्यावी लागतील.

ब) आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत मध्यवर्ती न्यासाने तर्फे तयार करण्यात आलेली मार्गदर्शके व वेळोवेळी करण्यात येणाऱ्या बदलाप्रमाणे जिल्हास्तरीय शाखेला आपले आर्थिक व्यवहार ठेवावे व लिहावे लागतील.

क) जिल्हा शाखेला स्वतंत्रपणे आर्थिक निधी गोळा करण्याकरिता कोणत्याही प्रकारची देणगी / पावती पुस्तके छापण्याचा अधिकार नाही.

ड) जमा होणाऱ्या निधी/ देणगी/ सभासद शुल्का मधून मध्यवर्ती न्यासाच्या कार्यालयाकडे कलम १७ (८) मधील तपशिलाप्रमाणे रक्कम जिल्हा/ तालुका शाखेकडून देणगी रुपाने मध्यवर्ती न्यासाचे कार्यालयीन कामकाज पूर्ण करण्यासाठी आर्थिक साहाय्य म्हणून पाठवावी.

इ) जिल्हा शाखांना जिल्हा पातळीवरील सर्व खर्च, जिल्हा पातळीवरच करावा लागेल. जिल्हापातळीवरील शाखेच्या जमा-खर्चास व आर्थिक व्यवहारांना जिल्हा पातळीवरील समितीलाच जबाबदार धरले जाईल. आर्थिक व्यवहारात संपूर्णतः पारदर्शकता असावी. प्रत्येक जिल्हा समितीने आपापले जमा-खर्चाचे हिशेब ठेवून सक्षम हिशेब तपासनिसाकडून तपासून सर्व जमाखर्चाच्या मूळ पावत्यासह व देणगी पावत्यासह आपला हिशेब दरवर्षी १५ एप्रिलपर्यंत मध्यवर्ती न्यासाच्या कार्यालयात जिल्ह्यातील सक्षम अधिकाऱ्यांच्या मार्फत किंवा जिल्हाध्यक्ष, सचिव, खजिनदार या तिघांपैकी दोघांनी जमा केला पाहिजे. जिल्ह्यातील आर्थिक व्यवहाराबाबतची लागणारी सर्व मूळ दस्त ऐवज, कॅशबुक, खतावणी व

आवश्यक ती सर्व हिशेब पुस्तके घेऊन यावीत. मध्यवर्ती न्यासाच्या कार्यालयातील आर्थिक हिशेब पाहणाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील हिशेब पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्याखेरिज आपणास जबाबदारीतून मुक्त होता येणार नाही.

फ) जिल्हास्तरीय समितीच्या जमा-खर्चास, हिशेबास व आर्थिक बाबींवर आक्षेप घेण्याचा अधिकार मध्यवर्ती न्यासाच्या मंडळास राहील. त्याच प्रमाणे जिल्हा शाखेच्या हिशेब व आर्थिक बाबींवर मध्यवर्ती न्यासाचे कार्यकारी मंडळ ठरवील त्याप्रमाणे नियंत्रण राहील.

### *१८) जिल्हास्तरीय शाखेचा निधी मिळकत विनियोग :*

सभासद वर्गणी, देणगी, अनुदान सामान्य उत्पन्न इत्यादी साधने होत, मध्यवर्ती न्यासाच्या उद्देशपूर्तीसाठी निधी गोळा करण्यात येईल, तो स्थावर स्वरुपाच्या मिळकतीसाठी गुंतवणूक करता येईल; पण त्याची मालकी मध्यवर्ती न्यासाकडे राहील व त्यांच्या संमतीनेच स्थावर मालमत्ता खरेदी व विक्री करता येईल, रकमेची मुदत ठेवीमध्ये गुंतवणूक करता येईल. पण सदर रक्कम ही फक्त बँक ऑफ महाराष्ट्र जिल्हा शाखा बँकेतच ठेवावी लागेल.

### *१९) उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतूद :*

मध्यवर्ती न्यासाच्या उद्देशपूर्तीकरिता जिल्हा शाखा स्थापन केलेल्या आहेत. मध्यवर्ती न्यासाचा कार्यालयीन कारभार चालविण्यासाठी कलम क्रमांक १७ (८) अ, ब, क आणि ड प्रमाणे

देणगी स्वरुपात रक्कम पाठवावी व त्याची पावती मध्यवर्ती न्यासाकडून मिळेल. जिल्हास्तरावर देण्यात येणाऱ्या प्रत्येक निधी (देणगी) पुस्तकाव्दारे जमा होणाऱ्या एकूण वार्षिक उत्पन्नातून १०% रक्कम मध्यवर्ती न्यासाकडे, १५% रक्कम जिल्हा न्यासाकडे व शिल्लक ७५% रक्कम तालुका शाखा किंवा निधी जमा करणाऱ्या शाखेला मध्यवर्ती न्यासाच्या उद्देशपूर्तीकरिता खर्चासाठी उपलब्ध होईल.

## *२०) कर्ज किंवा ठेवीयांसंबंधी तरतूद :*

जिल्हा शाखेस आवश्यकता वाटत असल्यास कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून न्यासाच्या कामकाजासाठी कर्ज किंवा ठेवी (बिन व्याजी) स्वीकारता येईल; पण त्याची मुदत सहा महिन्यांपेक्षा जास्त असणार नाही किंवा कार्यकारी मंडळाच्या कार्यालयाच्या मुदतीपेक्षा जास्त असणार नाही. यांपैकी जी मुदत कमी असेल त्याच मुदतीकरिता कर्ज किंवा ठेवी स्वीकारता येतील; पण कोणत्याही परिस्थितीत ३१ मार्चपूर्वी असे कर्ज किंवा ठेवी परत करण्यात आल्या पाहिजेत. याबाबतीत कोणत्याही ठेवी आणि कर्जाची जबाबदारी मध्यवर्ती न्यासाकडे असणार नाही. जर याबाबत सक्षम शासकीय कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे गरजेचे असेल तर ती घेण्याची जबाबदारीही जिल्हा शाखेची राहील.

### ***२१) स्थावर मालमत्ता खरेदी-विक्री बाबत तरतूद :***

जिल्हास्तरीय शाखेला स्थावर मालमत्ता खरेदी व विक्री करण्याचे अधिकार जिल्हा कार्यकारी मंडळास राहिल, पण खरेदी विक्री करण्यापूर्वी जिल्हा सर्व साधारण सभेत मंजुरी घेणे आवश्यक राहिल, त्याप्रमाणे याबाबत सक्षम शासकीय कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे गरजेचे असेल तर ती घेण्याची जबाबदारीही जिल्हा शाखेची राहिल.

### ***२२) आर्थिक व्यवहारासंबंधाने बँक खाते :***

जिल्हा शाखेचे बचत खाते हे मध्यवर्ती न्यासाच्या नावाने बँक ऑफ महाराष्ट्र च्या जिल्हास्तरीय शाखेत असेल. सदर बँक खात्याचा व्यवहार जिल्हा कार्यकारिणी ठराव पारित करुन अध्यक्ष, सचिव, खजिनदार किंवा कार्यकारी मंडळाने यासाठी निवडलेला सभासद या तिघांपैकी दोघांच्या सहीने केला जाईल. बँक खाते व आर्थिक व्यवहार यांसंबंधाने मध्यवर्ती न्यासाच्या वतीने वेळोवेळी जी मार्गदर्शक तत्त्वे व नियम तयार करण्यात येतील, त्याप्रमाणे जिल्हा अध्यक्षांना सर्व अटींचे व शर्तींचे पालन करण्याबाबत प्रतिज्ञापत्रकाव्दारे करुन द्यावे लागेल.

### ***२३) सभासद यादी ठेवण्याची पध्दत :***

१८६० संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ३५ अनुसार जिल्हा शाखेचे जे सभासद असतील, त्यांची यादी १९७१ च्या संस्था नोंदणी महाराष्ट्र अधिनियमातील नियम क्रमांक १५

अनुसार अनुसूची ६ च्या नमुन्यात ठेवण्यात येईल. जिल्हा शाखेच्या सभासदांची यादी ठेवण्याची सर्व जबाबदारी जिल्हा कार्यकारिणीवर राहील.

### *२४) जिल्हा शाखेच्या नावात किंवा उद्देशात बद्दल करण्याची तरतूद :*

जिल्हा शाखेच्या नावात किंवा उद्देशात बदल करावयाचा झाल्यास किंवा दोन संस्थांचे विलीनीकरण करावयाचे झाल्यास, त्यासाठी मध्यवर्ती न्यासाची लेखी परवानगी घ्यावी लागेल.

### *२६) विसर्जन :*

जिल्हा शाखेला आपले कार्य बंद करावयाचे झाल्यास जिल्हा सर्वसाधारण सभेत तसे बहुमताने करता येईल, जिल्हा शाखेने जमा केलेली सर्व मालमत्ता व बँकेत शिल्लक असलेली रक्कम आर्थिक हिशेब, जमा-खर्चाच्या तपशिलासह मध्यवर्ती न्यासाकडे वर्ग करणे गरजेचे आहे.

अशा रीतीने आपण एकूण २६ मार्गदर्शक तत्त्वांमधून भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास जिल्हा/ तालुका शाखा/ समित्यांच्या कामकाजाचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला. वरील मार्गदर्शक तत्त्वांमधून हे स्पष्ट होते, की भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास जिल्हा/ तालुका शाखा/ समितीत्यांचे कामकाज २६ मार्गदर्शक तत्त्वांव्दारे होते.

## ६.७ जिल्हा व तालुका कार्यकारिणीच्या निवडीचे निकष / पध्दती :

१. ज्या सभासदांनी १ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीमध्ये वार्षिक सभासद वर्गणी भरली असेल, त्या सभासदांस जिल्हा/ तालुका कार्यकारिणीमध्ये पदाधिकारी म्हणून कार्य करता येईल व मतदाराना हक्क प्राप्त होईल.

२. तालुकास्तरीय कार्यकारिणीकरिता त्याच तालुक्यातील सभासदांचा विचार करण्यात येईल.

३. जिल्हा स्तरावरील कार्यकारिणीची निवड त्याच जिल्ह्यातील सर्व तालुका कार्यकारिणीतून निवडून आलेल्या सभासदांनी करावी.

४. तालुका कार्यकारिणी किमान ७ व कमाल ११ व्यक्तींची असेल. त्यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, खजिनदार व इतर सदस्य असतील.

५. जिल्हा कार्यकारिणी मार्गदर्शिकेतील मुद्दा क्रमांक १० व ११ प्रमाणे गठित होईल.

**६.८ कार्यकारिणीस मान्यता देण्याची पध्दती :**

१. राज्य समिती ही जिल्हा कार्यकारिणीस मान्यता देईल.

२. जिल्हा कार्यकारिणी तालुका कार्यकारिणीस मान्यता देईल.

३. तालुका कार्यकारिणी जिल्हा परिषदेचे गट व पंचायत समिती स्तरावरील गटास मान्यता देईल, त्यालाच गावपातळीवरील शाखा असे संबोधण्यात येईल.

४. वरिल सर्व कार्यकारिणीचा कालावधी (१ ते ३) १ एप्रिल ते ३१ मार्च असा राहील (संस्था नोंदणी कायद्याप्रमाणे असलेल्या तरतुदीआधारे नवीन कार्यकारिणी अस्तित्वात येईपर्यंत जुनी कार्यकारिणी हंगामी म्हणून कार्यरत राहील.)

## ६.९ सभासदांना करावाच्या कार्याची पंचसूत्री :

१. संघटन बांधणी/ जास्तीत जास्त चारित्र्यसंपन्न संभासदांची नोंदणी करणे.

२. सभासदांना प्रशिक्षण देणे.

३. प्रचार व प्रसारासाठी तज्ज्ञ सभासदांचे गट तयार करणे.

४. लोकशिक्षण व लोकजागृती करण्यासाठी प्रचारसाहित्य निर्माण करणे.

५. जनहिताच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता लोकशिक्षण, लोकजागृती लोकसंघटन करुन निर्भय कार्यकर्ते बनविणे.

## ६.१० पत्रव्यवहाराबाबत :

१. जिल्हा कार्यकारिणीने पत्रव्यवहार लेटरपॅडवर करावा, जेणेकरुन सर्व जिल्ह्यांतील कार्यामध्ये सुसूत्रता - एकात्मता दिसून येईल.

२. जिल्हा व तालुकास्तरावर आवक - जावक पत्राची नोंद वहीत ठेवणे आवश्यक राहील.

३. जिल्हा व तालुका कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांनाच, जिल्हा व तालुका बैठकीत ठराव करुनच ज्या विषयावर पत्रव्यवहार करावयाचा आहे, असा निर्णय झाला असेल अशाच विषयावर पत्रव्यवहार करणे अपेक्षित आहे.

४. कोणत्याही पदाधिकाऱ्यांनी लेटरपॅडचा वापर वैयक्तिक कारणाकरिता किंवा वैयक्तिक तक्रारींचे निवारण करण्याकरिता करु नयेत.

५. पत्रव्यवहार शक्यतो जिल्हा अध्यक्ष व जिल्हा सचिव तसेच तालुका अध्यक्ष व तालुका सचिव यांच्या सहीनेच करण्यात यावा व त्याची नोंद जावक रजिस्टरमध्ये होणे गरजेचे आहे, प्रत्येक पत्राची कार्यालयीन प्रत कार्यालयात असली पाहिजे.

## ६.११ तक्रार निवारणासंबंधी..

१. जिल्हा शाखेच्या कामकाजाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

२. तक्रारींसह सर्व पत्रव्यवहार जिल्हा/तालुका कार्यालयातील आवक-जावक रजिस्टरमध्ये नोंद करणे आवश्यक आहे.

३. जिल्ह्यातील आलेल्या सर्व तक्रारींच्या नोंदीनंतर जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीच्या वेळी सर्व तक्रारींची छाननी करुन आवश्यकता असेल तेव्हा विषयतज्ज्ञ/ कायदेतज्ज्ञ ाचा सल्ला घेऊन पदाधिकाऱ्यांनी योग्य तो निर्णय घ्यावा. निर्णय घेण्यापूर्वी खालील गोष्टी विचारार्थ घेतलेल्या असाव्यात.

अ) वैयक्तिक/ कौटुंबिक स्वरुपाच्या तक्रारींची दखल घेण्यात येऊ नये; परंतु मानवतावादी दृष्टिकोन ठेवून जे शक्य असेल ते मार्गदर्शन करावे; पण लेटरपॅडचा वापर करुन पत्रव्यवहार करण्याचे टाळावे.

ब) तक्रारदाराकडून प्रतिज्ञापत्र व तक्रारीसंबंधी कागदोपत्री पुरावे घेऊनच पुढील कार्यवाही करावी.

क) तक्रार ज्या व्यक्ती/ संस्थेविरुध्द असेल त्यांना त्यांची बाजू मांडण्याची पूर्ण संधी देण्यात यावी, तक्रारींची वास्तविकता व भविष्यकालीन होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करुनच आलेली तक्रार आंदोलनाच्या वतीने पुढे घेऊन जायची किंवा नाही याचा निर्णय सर्व कार्यकारी मंडळातील पदाधिकाऱ्यांनी मिळून घ्यावा.

४. प्रत्येक कार्यकर्त्याने व पदाधिकाऱ्याने जिल्ह्यातील आपल्याकडे आलेली प्रत्येक तक्रार कार्यकारिणीच्या बैठकीत मांडावी व त्यानंतर योग्य तो निर्णय घ्यावा.

५. न्यायालयीन प्रक्रिया सुरु असलेल्या तक्रारीची दखल घेऊ नये.

६. सामाजिक हिताच्या तक्रारीमध्येच लक्ष केंद्रित करावे.

७. कार्यकारिणीत येणाऱ्या निर्णयाप्रमाणेच पुढील कार्यवाही/ पत्रव्यवहार/ पाठपुरावा करण्यात यावा.

८. निवडलेल्या व योग्य निर्णय घेतलेल्या तक्रारी शासकीय जिल्हा/ तालुका भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे पाठवून त्याचा पाठपुरावा निर्णय मिळेपर्यंत करावा. हा मार्ग आंदोलनाच्या

कार्यकर्त्यांच्या दृष्टीने योग्य, सनदशीर व आंदोलनाची प्रतिमा समाजामध्ये वाढविण्याच्या दृष्टीने योग्य आहे.

९. फक्त कार्यकारिणीच्या बैठकीत चर्चा करण्यात आलेल्या तक्रारींचीच नोंद व्हावी व योग्य ती कार्यवाही केली जावी.

**६.१२ जिल्हा शाखेने आर्थिक हिशेब ठेवण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे :**

१. संस्थेची नोंदणी अधिनियम १८६० च्या अधिनियम २१ अंतर्गत व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अधिनियम १९ या अन्वये ठेवाव्या लागणाऱ्या पध्दतीप्रमाणे आर्थिक हिशेब ठेवावे. आर्थिक वर्ष हे १ एप्रिल ते ३१ मार्च असे असेल.

**२. बँकेत खाते उघडण्यासंबंधी :**

१. राज्य समितीकडून ठरावाव्दारे जिल्ह्यातील बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये बचत खाते उघडण्यात येईल, त्यासाठीचा पत्रव्यवहार राज्य समितीकडून करण्यात येईल.

२. जिल्हा कार्यकारिणीकडून सदर खाते चालविण्यासाठी एका ठरावाव्दारे तीन पदाधिकाऱ्यांची नावे निश्चित करुन ती पाठविण्यात यावीत.

३. राज्य समिती जिल्हा शाखेकडून एक प्रतिज्ञापत्र तयार करुन घेईल, त्यानंतरच जिल्हा शाखेला बचतखाते चालविण्याची परवानगी देण्यात येईल.

४. हे बचत खाते राज्य समितीस संलग्न असेल, त्यावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार राज्य समितीस असतील.

५. बँक खाते स्थगित ठेवण्याबाबत ज्या वेळी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये आपापसात मतभेद होऊन आर्थिक व्यवहारासंबंधाने काही शंका, तक्रारी किंवा अडचणी लेखी स्वरुपात आल्यास त्याची चौकशी पूर्ण होईपर्यंत खाते वापरण्यासंबंधी स्थगितीचा निर्णय घेण्याचे अधिकार राज्य समितीकडे असतील. स्थगितीच्या काळात जमा होणारा निधी खात्यात भरता यईल; पण काढता येणार नाही.

## ३. निधी गोळा करण्याची पध्दत :

१. राज्य समितीकडून देण्यात आलेल्या पावती/ देणगी/ निधी पुस्तकाव्दारेच जिल्ह्यातील नागरिकांकडून निधी गोळा करता येईल. उदा. वार्षिक सभासद शुल्क वर्गणी, अनुदान, सामान्य उत्पन्न इ.

२. जमा होणाऱ्या निधीचा वापर (खर्च) करण्यापूर्वी सर्व जमा रक्कम खात्यावर भरणे बंधनकारक असेल.

## ४. खर्च करण्याची पध्दत :

जमा होणाऱ्या रकमेतून खालील खर्चांना मान्यता देण्यात येईल.

१. नियमावलीतील कलम क्रं. १७ (८), कलम क्रं. १८, १९, २०, २१ प्रमाणे खर्च करण्यात येईल.

२. संघटन बांधणीकरिता होणारा खर्च

३. राज्य समिती सदस्यांच्या कार्यालयीन दौऱ्याच्या वेळी होणारा खर्च.

४. जिल्हा कार्यालयीन होणार खर्च.

५. लोकशिक्षण, लोकजागृती, लोकसंघटन यासाठी राज्य समितीच्या आदेशाने होणाऱ्या आंदोलनासाठी होणारा खर्च.

६. जिल्हा कार्यकारिणीच्या ठरावाव्दारे होणाऱ्या आंदोलनाकरिता झालेला खर्च.

७. जिल्हा कार्यकारिणीच्या ठरावाव्दारे न्यायालयीन कामकाज चालविण्यासाठी झ ालेला खर्च.

**५) हिशेब तपासणीची पध्दत :**

१. दर तीन महिन्यांनी जिल्हास्तरावर सर्व जमाखर्चाच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी व्हावी.

२. आर्थिक नोंदी वेळच्या वेळी पूर्ण कराव्यात.

३. दर सहा महिण्याने जिल्हास्तरावर हंगामी तपासणी अंतर्गत हिशेब तपासनीसाकडून करुन घ्यावी व त्याची एक प्रत मुख्य कार्यालयाकडे ३१ ऑक्टोबर पूर्वी पाठविण्यात यावी.

अशा प्रकारे भ्रष्टाचारविरोधी जन आंदोलन न्यास ही ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी स्थापन केलेली संस्था, हा विश्वस्त निधी वरील नियम, उपनियमांच्या अधीन राहून कार्य करत आहे. त्याचा उद्देश भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाची जिल्हा/ तालुका/ शहर शाखा हे फक्त तक्रार निवारणारे केंद्र असू नयेत, तर समाजपरिवर्तनाचे व कृतिशील कार्यकर्त्यांचे केंद्र असावे हा आहे. त्याचबरोबर संस्थापक अण्णा हजारे यांचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत कसे पोहचविता येतील यासाठी सातत्याने प्रयत्नशील असणारी व ध्येयवादी होऊन कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे केंद्र असावी. या उद्देशाने जिल्हा, तालुका शहर व गावातील कार्यकर्त्यांनी राष्ट्र व राज्य उभारणीच्या कार्यासाठी निःस्वार्थपणे व निरपेक्ष भावनेतून विधायक कार्यात स्वतःला झोकून दिले, तरच अण्णा हजारे व ज्यांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला अशा स्वातंत्र्यवीरांचे स्वप्न साकार करण्यास आपण खारी वाट्याने कार्यास लाग शकू असा ठाम विश्वास भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनासाठी निरपेक्षपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना वाटतो.[४]

## ६.१३ भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन एक परिवर्तनवादी चळवळ :

भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन ही १९९० पासून सुरु झालेली एक परिवर्तनवादी चळवळ आहे. माहितीचा अधिकार हा लोकशाही राज्यामध्ये प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे, तो त्यांना मिळालाच पाहिजे तसेच ग्रामसभा लोकशाहीची सर्वोच्च व्यवस्था असल्याने ग्रामसभेला कायद्याने जादा अधिकार मिळालेच पाहिजेत.

नागरिकांच्या कार्यालयांमधील कामांना जेवढा विलंब होतो तेवढा भ्रष्टाचार अधिक वाढत जातो. अधिकांश कार्यालयांमध्ये चिरीमिरी दिल्याशिवाय जनतेची कामे होत नाहीत. म्हणून एका टेबल वरिल पेपर दुसऱ्या टेबलवर ७ दिवसांच्या आत जायला हवा असा दप्तर दिरंगाई विरोधी कायदा करावा, शासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होतो, म्हणून बदल्यांचा कायदा करावा, दारुबंदीसाठी निश्चित धोरण ठरावे, या जनहिताच्या मागण्यांसाठी सरकारकडे भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलने होत असतानाच योगायोगाने काही त्यांच्यावर सरकारने कारवाई करावी म्हणून आंदोलने करावी लागली. काही वेळेला न्यायालयाचा आधार घ्यावा लागला. त्यामुळे काही मंत्र्यांना घरी पाठवावं एवढाच या आंदोलनाचा उद्देश नव्हता तर सामाजिक परिवर्तन घडावे हा मुख्य उद्देश होता. त्या दृष्टीने प्रयत्न चालू होता.

मंत्र्यांच्या गैरव्यवहाराची चौकशी व्हावी म्हणून चाललेल्या आंदोलनकाळात मंत्री आणि अण्णा हजारे यांचा सामना काही प्रसार माध्यमांनी उभा केल्यामुळे भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन

म्हणजे मंत्र्यांच्याविरोधी चाललेले आंदोलन, पक्ष-पार्ट्यांच्या विरोधात चाललेले आंदोलन, व्यक्तिव्देषापोटी चाललेले आंदोलन असा गैरसमज नागरिकांमध्ये निर्माण झाला होता.

वास्तविक पाहता सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन ती सत्ता जोपर्यंत मतदारांच्या हाती येणार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने लोकशाही येणार नाही, हा महात्मा गांधींचा संदेश होता. सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन सत्ता जनतेच्या हाती यावी हा आंदोलनाचा मुख्य उद्देश होता. त्यासाठी माहितीचा अधिकार, ग्रामसभेचा अधिकार, दप्तर दिरंगाई यांसारखे कायदे झाले तर सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन जनतेच्या हाती अधिकार येतील व नागरिकांना लोकशाहीचा अनुभव येईल. अशा उद्देशाने व ध्येयाने भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनातर्फे वेळोवेळी आंदोलने होत राहिली.

सरकारने वरील कायदे करावेत या कायद्यासंबंधाने लोक-शिक्षण व लोकजागृती व्हावी यासाठी भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाच्या माध्यमातून अण्णा हजारे यांचे महाराष्ट्रामध्ये कायदे करण्यापूर्वी चार वेळेला दौरे झाले. या दौऱ्यामध्ये या कायद्यासंबंधाने चांगल्या प्रकारची लोकजागृती झाली. त्यामुळे महाराष्ट्रातील दौऱ्यामध्ये आणि वेळोवेळी झालेल्या आंदोलनामध्ये जनतेचा चांगला सहभाग लाभला. वैयक्तिक स्वरुपात अण्णा हजारे यांच्या नावाने कोणत्याही शिल्लक ठेव ठेवली नाही. प्रत्येक दौऱ्यामध्ये सभा झाल्यानंतर आर्थिक मदतीसाठी झोळी ठेवली जाते. अण्णा हजारे यांच्या सभेच्या वेळी जनतेला ५ रुपये ते १० रुपये झोळीत टाकण्यास सांगतात असे गेली १० ते १२ वर्षात या झोळीतील आर्थिक मदतीच्या आधाराने हे आंदोलन चालले आहे, जनतेने या कामी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जमा झालेले झोळीतील पैसे संबंधित गावातील दोन

प्रतिष्ठीत व्यक्तीसमोर समक्ष मोजून घेतले जातात. त्यांना त्या पैशाची पावती दिली जाते आणि तो पैसा संस्थेच्या खात्यामध्ये जमा होतो. जेणेकरुन त्याबद्दल कोणाच्या मनात शंका येऊ नये.

माहितीचा अधिकार, ग्रामसभेला अधिकार, दप्तरदिरंगाई, बदल्यांचा कायदा यासाठी १९९७ पासून वेळोवेळी दहा वेळेला आंदोलन अण्णा हजारे यांना आंदोलने करावी लागली. वेळोवेळी आंदोलने करुनही सरकार कायदे करत नाही म्हणून ९ ऑगस्ट २००३ रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर 'करेंगे या मरेंगे' या ध्येयाने आंदोलनासाठी महाराष्ट्राच्या सर्व भागांतून मोठ्या प्रमाणावर जनता सहभागी झाली होती.

वेळोवेळी आंदोलने झाली तेव्हा सरकारने कायदे करण्यात येतील असे लेखी आश्वासन दिले; मात्र कायदे करायला सरकार तयार नव्हते. सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन जनतेच्या हाती सत्ता यावी असे कोणत्याच सरकारला वाटत नाही. या आंदोलनातही सरकारने आंदोलन स्थगित करावे म्हणून मध्यस्थी करण्यासाठी पुन्हा मंत्र्यांना आझाद मैदानात पाठविले होते. या आंदोलनामध्ये निश्चय झाला होता, की माहितीच्या अधिकाराचा कायदा होईल अथवा आमचे बलिदान होईल. दोन्हीपैकी एक घडेल; त्यामुळे सरकारशी वाटाघाटीच्या वाटा बंद केल्या होत्या. आधी कायदा करा; मग बोलणीसाठी या ही भूमिका अण्णा हजारे यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतली होती.

उपोषणाचे १२ दिवस गेले आणि राष्ट्रपतींनी माहितीचा अधिकार या कायद्यावर सही करुन हा कायदा महाराष्ट्र राज्यात २००२ पासून लागू केल्याचे जाहीर केले. माहितीच्या अधिकाराचा

कायदा म्हणजे स्वातंत्र्याच्या ५८ वर्षांनंतर लोकशाहीच्या दृष्टीने पडलेले एक क्रांतिकारक पाऊल आहे.

महाराष्ट्र राज्यात लागू झालेला कायदा अत्यंत प्रभावी ठरला आणि याच कायद्याचे अनुकरण केंद्र सरकाने केले; एवढेच नाही तर भारत सरकारने या कायद्यामध्ये आणखी काही सुधारणा करुन हा कायदा देशभर लागू केला. या कायद्यामुळे आपण लोकशाही राज्यात आहोत असा नागरिकांना अनुभव येऊ लागला आहे.

या कायद्यामुळे सरकारी कार्यलयांमधील आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता येऊन गैरव्यवहारांना आळा बसू लागला आहे, भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाच्या चळवळीतून माहितीचा अधिकार, ग्रामसभेचा अधिकार, दप्तरदिरंगाईचा कायदा, बदल्यांचा कायदा, दारुबंदी धोरण यासारखे कायदे झाले. त्याचबरोबर सामान्य माणसांना न्याय मिळावा म्हणून रॉकेल, रेशनिंग, गॅस या जीवनाश्यक गरजा गरीब माणसांनापर्यंत जव्यात यासाठी वितरण व्यवस्थेसंबंधीची चळवळ उभी करावी लागली. गरीब माणसांच्या सहकारी पतसंस्था आणि नागरी बँकांमध्ये ठेवलेल्या ठेवींचा पैसा त्यांना मिळावा यासाठी चळवळ उभी करावी लागली. मोठ्या प्रमाणावर गरीब माणसांना त्यांच्या ठेवी परत मिळाल्यामुळे आता जनतेला हळूहळू पटले आहे, की भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन ही एक परिवर्तनवादी चळवळ आहे, जनहितासाठी झटणारी चळवळ आहे.

जनतेच्या अशा संघटित चळवळीमधून निकोप लोकशाही वाढीला लागेल, ही चळवळ अधिक जोमाने वाढीला लागावी यासाठी चारित्र्यशील कार्यकर्त्यांनी या चळवळीमध्ये योगदान दिले

तर सामान्य माणसांच्या हितासाठी खूप काही करता येईल. २०२० मध्ये देशाला महासत्ता बनविण्यासाठी विकासकामांना गती देणे जेवढे महत्त्वाचे आहे, तेवढीच विकासकामांना लागलेली भ्रष्टाचाराची गळती थांबविणे महत्त्वाचे आहे. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी झालेले कायदे घराघरापर्यंत कसे जातील असा प्रयत्न करावा लागेल. त्याप्रमाणे सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आणि विकेंद्रीकरणाचे नवीन कायदे करण्यावर अधिकारात अधिक भर द्यावा लागेल.

**माहितीच्या अधिकाराप्रमाणे विकेंद्रीकरणाचा नवा कायदा करावा :**

माहितीच्या अधिकाराप्रमाणे विकेंद्रीकरणाचा कायदा सरकारने करावा; यासाठी जनतेने स्वातंत्र्याची दुसरी लढाई समजून चळवळ उभी करणे आवश्यक आहे. जगाच्या पाठीवर सर्वांत अधिक लोकसंख्या असणारा भारत हा लोकशाहीवादी देश आहे. या देशात अनेक जाती, पाती, धर्म, वंश, पक्ष, पाट्या असूनही हा देश साठ वर्षे लोकशाही मार्गाने वाटचाल करीत आहे. या वाटचालीला आमच्या देशाची संस्कृती-परंपरा, महापुरुषांच्या जनेसेवेचा आम्हाला लाभलेला वारसा ही कारणे असली तरी न्यायव्यवस्था ही त्यांतील एक प्रमुख कारण आहे. न्यायव्यवस्थेच्या आधाराने हा देश स्वातंत्र्याची साठ वर्षे लोकशाही मार्गाने चालला आहे, हे नाकारता येत नाही.

गल्लीपासून दिल्लीपर्यंत देशाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी घटनेने कायद्याच्या बरोबरीने प्रशासन सेवेची (ॲडमिनिस्ट्रेशन) निर्मिती केलेली आहे. या देशाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी घटनेप्रमाणे कायद्याबरोबरच प्रशासन सेवेची जबाबदारी फार महत्त्वाची आहे.

राज्य, राष्ट्र आणि जनहिताच्या दृष्टीने सर्वांगीण विकास करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, त्या योजनामध्ये होणारे गैरव्यवहार, नागरिकांचे हक्क डावलून त्यांच्यावर होणारा अन्याय यांसारखा नागरिकांच्या अनेक अडी अडचणी संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या स्तरावरच सोडवायच्या आहेत. जेणेकरुन कोणाही नागरिकांला वरिष्ठांकडे किंवा न्यायालयाकडे धाव घेण्याची वेळ येऊ नये. अपवादात्मक एखाद्या गोष्टीचे निराकरण प्रशासन सेवेच्या पातळीवर होत नसेल, तरच त्यांनी वरिष्ठांकडे किंवा न्यायालयाकडे जावे, ही प्रशासन सेवेकडून जनतेची अपेक्षा असते. त्याचबरोबर ज्या विविध योजना राबविल्या जातात, त्या योजनांच्या कामाची गुणवत्ता चांगली असावी अशीही अपेक्षा असते.

आज चित्र वेगळे दिसते आहे. माहितीच्या अधिकाराखाली काही नागरिकांनी माहिती मागितली आहे, त्यांना माहिती अधिकाऱ्यांकडून जी माहिती मिळते त्या माहितीमध्ये काही अधिकाऱ्यांकडून, कर्मचाऱ्यांकडून गैरव्यवहार झाले आहेत हे स्पष्ट झाले आहे. त्याचे पुरावे ही माहितीच्या अधिकाराखाली मिळाले आहेत. त्या पुराव्यांच्या आधाराने त्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही व्हावी म्हणून नागरिक वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे प्रयत्न करीत असतात; मात्र वरिष्ठांकडून त्यांच्या तक्रारीची दखल घेतली जात नाही. मुद्दाम टाळाटाळ केली जाते, ही वस्तुस्थिती आहे. उदा. गावातील ग्रामसेवक किंवा तलाठी यांच्याच गैरव्यवहाराचे पुरावे आहेत. नागरिक, बीडीओ किंवा तहसीलदार यांच्याकडे पुरावे दाखल करुन कार्यवाही करण्याचा आग्रह धरतात; मात्र नागरिकांच्या तक्रारींची दखल घेतली जात नाही.

याउलट नागरिकांना वरिष्ठांकडे जा! कोर्टात! असेही सांगितले जाते. प्रशासन सेवेमध्ये न्यायनिवाडा करण्याचे आणि दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार कायद्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिलेले असताना टाळाटाळ करणे किंवा कोर्टात जा! असे सांगणे योग्य नाही. त्यांनी आपल्याला दिलेल्या अधिकाराचा वापर करुन आपल्या स्तरावरच न्यायनिवाडा करुन दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी. जेणेकरुन कोणाही नागरिकांला न्यायालयामध्ये जाण्याची वेळच येवू नये.

अलीकडे भारताचे सरन्यायाधीश यांनी खंत व्यक्त केली आहे, की न्यायाधीशांची संख्या कमी असल्याने आज देशामध्ये ५ कोटी ८८ लाख दावे न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत. न्यायाधीशांची संख्या कमी आहे हे एक कारण असले तरी, प्रशासन सेवेमधील काही अधिकारी, कर्मचारी आपल्या कर्तव्याचे पालन करीत नसल्याने नाइलाजास्तव नागरिकांना न्यायालयाकडे धाव घ्यावी लागते. त्यामुळे न्यायालयातील प्रलंबित दाव्यांची संख्या वाढत जाते आणि नागरिकांना वर्षोनुवर्षे न्यायाच्या प्रतीक्षेत राहावे लागते. त्यांच्या आयुष्यातील मौल्यवान वेळ व पैसा त्यात खर्च होतो. न्यायाधीशांना त्यासाठी वेळ द्यावा लागतो. यात सुधारणा करण्यासाठी माहितीच्या अधिकाराप्रमाणेच सत्ता विकेंद्रीकरणाचा एक प्रभावी कायदा सरकारने करण्याची गरज आहे.

सरकाने असा कायदा करावा, यासाठी जनतेने आग्रही असावे. यदाकदाचित सरकारने असा कायदा करण्यास टाळाटाळ केली तर ही स्वातंत्र्याची दुसरी लढाई समजून राज्यभर आंदोलने उभी करण्याचा प्रयत्न करावा लागेल. वेळप्रसंगी तुरुंगामध्ये जाण्याची तयारी ठेवावी लागेल. या

आंदोलनामध्ये युवा शक्तीची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहणार आहे. कारण स्वातंत्र्याची ६० वर्षे उलटली; मात्र भ्रष्टाचार कमी झालेला नाही. गुंडगिरी, दहशतवाद, जनतेच्या पैशाची लूट कमी झालेली नाही. म्हणजेच खऱ्या अर्थाने अद्यापही नागरिकांना स्वातंत्र्य मिळालेले नाही. हे स्वातंत्र्य मिळण्यासाठी नागरिकांच्या हाती सत्ता असणारे कायदे करावे लागतील. हा कायदा माहितीचा अधिकार-२००५ पेक्षाही प्रभावी ठरणार असल्याने भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनामधे फक्त चरित्रवान, शुध्द आचार, शुध्द विचार, निष्कलंक जीवन, आणि त्यागाची तयारी असणाऱ्या कार्यकर्त्यांनी तसेच सामजिक, राष्ट्रीय दृष्टिकोन असणाऱ्या ध्येयवादी कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने चळवळीमध्ये सामील होणे आवश्यक आहे, असे ज्येष्ठ समासेवक अण्णा हजारे यांचे मत आहे.[५]

**संदर्भ सूची :-**


१) उंडे शंकर पिराजी : दै. चंपावतीपत्र, भ्रष्टाचार कारणे व उपाय दि.०९ नोव्हेंबर २००९.

२) हजारे अण्णा : निर्भय बनो, (मार्गदर्शिका), सुधारित आवृत्ती, जुलै २००९. भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास (महाराष्ट्र) मु.पो. राळेगणसिध्दी ता. पारनेर जि. अहमदनगर पृ.क्र. १, २, ३.

३) हजारे अण्णा : निर्भय बनो, मार्गदर्शिका सुधारित आवृत्ती : जुलै २००९. मुद्रक व प्रकाशक भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास मु.पो. राळेगणसिध्दी ता. पारनेर जि. अहमदनगर पृ.क्रं. ४,५.

४) हजारे अण्णा : निर्भय बनो, मार्गदर्शिका सुधारित आवृत्ती, जुलै २००९. मुद्रक व प्रकाशक : भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास मु.पो. राळेगणसिध्दी ता.पारनेर जि.अहमदनगर पृष्ठ क्रमांक ६ ते २५.

५) हजारे अण्णा : निर्भय बनो, एप्रिल २००८ वर्ष १ ले अंक २, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यासाचे प्रकाशन मु.पो. राळेगणसिध्दी ता. पारनेर जि. अहमदनगर.

पृ.क्रं. ७ ते ११.